# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/03/2023 (शुक्रवार) सकाळ


---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. खापरखेडा :—** अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील बिना संगम येथे दिनांक १६/०३/२०२३ चे १९.१५ वा. ते २०.०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— १) दिनेश शामराव उपवंशी, वय १९ वर्ष, रा. वार्ड नंबर ९ कोराडी तालुका कामठी नमूद आरोपी हा (२) मालक नामे— उदयभान रघुवंशी रा. कोराडी याच्या सांगितल्यावरून बिना संगम कन्हान नदीच्या पात्रातून महींद्रा कंपनीचा ट्रक क्रमांक एम एच—४० एन—७९७५ मध्ये अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक करताना मिळून आल्याने आरोपीच्या ताब्यातून महिंद्रा कंपनीचा ट्रक क्रमांक एम एच ४० एन ७९७५ किंमती अंदाजे १२,००,०००/— रुपयाचा मुद्देमाल तसेच ट्रकच्या मागील डाल्या मध्ये अंदाजे चार ब्रास रेती किंमती अंदाजे १२,०००/—रुपये असा एकूण १२,१२,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा उमेश ठाकरे ब. नं. १०६ पोस्टे. खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा उमेश ठाकरे ब नं १०६ मो नं. ९८२२७६४९९९ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ३० कि. मी. अंतरावरील मौजा पिराया गोकुल खदान येथे दिनांक १४/०३/२०२३ चे २३.३० वा. ते २४.०० वा. चे दरम्यान फिर्यादी नामे— राहुल गोपाल कावडे, वय ५० वर्ष रा. कावरापेठ ईलेक्ट्रीक डि पी जवळ उमरेड हे दि. १५/०३/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा. दरम्यान डयुटीवर गेले असता एम. एस. एफ चे डयुटीवरील जवान यांचे कडून माहीती मिळाली की गोकुल खदान येथील जुना वापरता मोटार पंपचा कॉपर केबल ७० एम. एम., ५० एम. एम., ३५ एम. एम. असे एकूण तिन केबल अंदाजे ७०० मिटर किंमती प्रती मिटर १०००/—रू मिटर असा एकुण अंदाजे ७००००/—रूपयाचा मुद्देमाल दिसून येत नाही असे सांगितले वरून फिर्यादी व सोबत दोन एम. एस. एफ चे जवान त्या कॉपर केबल असलेल्या ठिकाणी जावून बघितले तेव्हा गुंडाळी मारून असलेला जुना वापरता कॉपर मोटार केबल कोणत्यातरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रविंद्र वाघ मो. नं. ८६२४८०१९९२ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर